"कृपया प्रसिध्दी करिता

माहिती व जनसंपर्क कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. पर्या/८७०
दिनांक: ०६/११/२०२६

पुणे महानगरपालिका, पर्यावरण विभाग

जाहीर सूचना

ध्वनी प्रदूषण व वायू प्रदूषण नियंत्रणाबाबत नागरिकांना आवाहन

पुणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांना याद्वारे सूचित करण्यात येते की, मा. मुंबई उच्च न्यायालयाने स्वतःहुन दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.०१/२०२६ मध्ये दि. २२/०९/२०२६ व १५/१०/२०२६ रोजी दिलेल्या आदेश तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ याची अधिसूचना MPCB/UDNAPCYTB/B-0073 दि.०३/१०/२०२४ नुसार आवाज निर्माण करणाऱ्या तसेच वायू प्रदूषण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती विक्री किंवा वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. आपणास सर्वांना माहीतच आहे की, आपण वातावरणीय बदलाना सामोरे जात आहोत. वातावरणीय बदलाच्या अनेक कारणांपैकी हवेचे प्रदूषण हे एक महत्वाचे कारण आहे. विविध सण उत्सव प्रसंगी आपण वाजवत असलेल्या फटाक्यांमध्ये कार्बन सल्फरचे प्रमाण अधिक असते. जे विषारी वायूंची श्रेणी तयार करतात. त्याअनुषंगाने पुणे शहरातील नागरिकांना खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करण्याचे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

१. सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यास प्रतिबंध

सार्वजनिक रस्ते, चौक, गल्ली, पदपथ, उद्याने, टेरेस, बाल्कनी तसेच इतर सार्वजनिक ठिकाणी नागरिकांना व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने फटाके फोडू नयेत.

२. शांतता क्षेत्रामध्ये फटाके फोडण्यास प्रतिबंध

रुग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये व इतर अधिसूचित शांतता क्षेत्रांच्या परिसरात फटाके फोडू नयेत.

३. ध्वनिवर्धक यंत्रणेसाठी परवानगी व अटींचे पालन

सार्वजनिक कार्यक्रम, मिरवणुका व इतर उत्सवांमध्ये ध्वनिवर्धक यंत्रणेचा वापर करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची आवश्यक परवानगी घेणे व परवानगीतील सर्व अटी तसेच ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० मधील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

४. ध्वनी व वायू प्रदूषण टाळा

फटाके व ध्वनिवर्धक यंत्रणांमुळे होणारे ध्वनी व वायू प्रदूषण टाळण्यासाठी नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने सण व उत्सव साजरे करावेत. फटाक्यांचा वापर टाळावा.

५. हेल्पलाईन नंबर- ०२०-२५५०१२६९/ २५५०८८०० तक्रारीकरीता टोल फ्रीनंबर- १८००१०३०२२२

६. नागरिकांना आवाहन

सण व उत्सवांच्या काळात फटाक्यांमुळे होणारे ध्वनी व वायू प्रदूषण नागरिकांच्या आरोग्यावर, विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण तसेच श्वसनविकार असलेल्या व्यक्तींवर विपरीत परिणाम करू शकते.

त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने पुणे महानगरपालिका नागरिकांना सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन करीत आहे.

वरील सूचनांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध प्रचलित कायदे व नियमांनुसार संबंधित सक्षम प्राधिकरणामार्फत आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

पुणे शहर स्वच्छ, सुंदर, प्रदूषणमुक्त व आरोग्यदायी ठेवण्यासाठी सर्व नागरिकांनी पणें महानगरपालिकेस सहकार्य करावे, ही विनंती.

(नवल किशोर राम)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका